# व्यक्ती-वल्ली - चेंबूरचे डॉ. प्रमोद चेंबूरकर

मंडळी,


हा लेख सादर करतांना एका बाजूने आनंद व दुःखही होतंय. कांही व्यक्ती आपल्या जीवनात अचानक येतात आणि अचानक निघून जातात. मात्र त्यांच्या संस्मरणीय आठवणी आपल्या कायमच्या स्मरणात रहातात. असं मी नाईलाजाने कां म्हणतोय ते हा लेख वाचून तुमच्या ध्यानात येईल. असो.

आपला,

जयंत.

---

डॉ. प्रमोद चेंबूरकरांची व मृणालताईंची माझी पहिली ओळख मराठी विश्वच्या 'साहित्य कुंज' मध्ये झाली होती. त्यानंतर खाजगी ओळख व अधिक परिचय झाला तो लॉन्ग आयलंडला रहाणाऱ्या डॉ. बाळकृष्ण-अण्णा निगळे यांच्या घरी झालेल्या भेटीत. निगळे व चेंबूरकर एकाच (औषध कंपनीच्या) व्यवसायात असल्याने व दोघेही अहमदाबाद येथील प्रसिद्ध University of Pharmacy, Ahmedabad, मधून शिक्षण घेऊन त्याच कॉलेजमध्ये शिकवत असल्याने तेव्हापासूनचे जिवलग मित्र होते. त्यामुळे चेंबूरकर हे अनेकदा निगळे यांच्या घरी भेटत होते. त्यावेळी बोलतांना मला चेंबूरकरांनी त्यांची वैयक्तिक माहिती थोडक्यात कथन केली होती. आणि मला ती उद्‌बोधक व महत्वाची वाटल्याने मी त्यांना म्हटले होते, तुम्ही आत्मचरित्र लिहावे. मी त्यासाठी मदत करीन वगैरे. असो.



*१) Pharmaceutical या क्षेत्रातील एकाच कॉलेजमधील दोन अत्यंत जिवलग मित्र, डॉ. प्रमोद चेंबूरकर व डॉ. बाळकृष्ण-अण्णा निगळे... २) प्रमोद व मृणालताई चेम्बुरकर... ३) आमच्या घरी आले असतांना, मृणालताई व प्रमोद यांचेसह मी...*

एके दिवशी मला चेंबूरकरांचा अचानक फोन आला. म्हणाले, *“जयंत, तुझ्या सांगण्यावरून मी माझं आत्मचरित्र लिहायचं ठरवलंय. त्यासाठी तुझी मला मदत लागेल. तत्पूर्वी मला जागतिक कीर्तीचे नामवंत वास्तुरचनाकार सुधीर जांभेकर यांची भेट घायची आहे. तेव्हा, आम्ही पुढील आठवड्यात तुझ्या घरी येऊ व तू आम्हाला जांभेकरांकडे घेऊन जा. त्याची ओळख करून दे. त्यांनी उत्कृष्टपणे लिहिलेले त्यांचे आत्मचरित्र वाचले. आणि ते तुझ्या प्रेरणेने त्यांनी लिहिले आहे हे कळले. तू म्हणतोस ते अगदी खरं आहे. माझंही आत्मचरित्र तसंच वाचनीय होईल...”*
ठरल्याप्रमाणे प्रमोद व मृणालताई आमच्या घरी आले. आणि आम्ही त्यांना सुधीर-ज्योस्त्ना जांभेकरांकडे घेऊन गेलो. सुधीर-ज्योस्त्ना यांचं अगत्य व स्वागत म्हणजे एका संस्थानिकासाखं राजेशाही असतं. त्यांचा थाट बघणे व अनुभवणे म्हणजे, एक प्रकारची ट्रीट व भाग्य असतं. सुधीरने त्याचं पुस्तक कसं घडलं त्याची चेंबूरकरांना अथपासून इतिपर्यंत माहिती दिली. अर्थात, त्यासाठी त्यांना लेखन सहाय्य्य घ्यायला लागलं होतं. नाहींतर ते शक्यच नव्हतं. थोडक्यात, माझी सर्वोतोपरी मदत चेंबूरकरांनाही लागणार होती आणि मी ती अंगावर घेतली होती. त्यामुळे चेंबूरकरांचा विश्वास अधिक दृढ झाला होता.

त्यानंतर प्रमोद व माझं फोनवरून अनेकदा दीर्घकाळ मोकळेपणाने संभाषण होत असे. त्यांच्या अविस्मरणीय आठवणी ते मला कथित करीत होते. अखेर माझ्या आग्रहास्तव त्यांनी त्यांचं पुस्तक प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला होता. मी त्यांना पुण्याचे प्रसिद्ध 'राजहंस प्रकाशनचे' मुख्य संपादक व माझे स्नेही डॉ. सदानंद बोरसे यांची ओळख करून दिली. आणि त्याचबरोबर लेखन साहाय्यासाठी माझ्या स्नेही सुप्रसिद्ध लेखिका सुलभा तेरणीकर यांचाही थेट संपर्क करून दिला होता. त्यानंतर कांही महिने निघून गेले, पुण्याला फोनवरून संपर्क करण्याऐवजी चेंबूरकरांनी स्वतः आठवणी लिहायला घेतल्या होत्या. मात्र, त्या आठवणी ते इंगजी मधून लिहीत होते. दरम्यान मला हळुहळू कळत होते की, प्रमोद यांच्या स्मरणशक्तीत विस्मरणाचा फरक होतोय. मात्र, जसं-जसं आठवत जाईल तस-तसं ते लिहीत होते व मला काळवीत होते. त्यानंतर त्यांनी मुंबई-पुण्याला जाऊन पुस्तक निश्चित प्रकाशित

करण्याचा निर्णय घेतला होता. अर्थात, मला ही अत्यंत आनंदनीय बातमी होती. आणि मला खात्री होती एकदा कां त्यांचं हस्तलिखित सुलभाताई व राजहंस प्रकाशनकडे गेले की कसलीच काळजी नाही. पण, इतके प्रयत्न करूनही दुर्दैवाने तसं घडलं नाही... मधुमेहामुळे प्रमोद यांच्या तब्बेतीवर, स्मरणशक्ती व श्रवणशक्तीवर बराच परिणाम होत गेला. त्यामुळे माझ्याशीही त्यांचा संपर्क कमी होत गेला होता. नंतर तर तो बंदही झाला. हे सर्व काळजी करण्यासारखंच होतं. चेंबूरकरांचे मित्र अण्णा निगळे यांच्याकडून मला अधून-मधून प्रमोद यांची माहिती मिळत होती. त्यावेळी प्रमोद व मृणालताई यांनी त्यांचा मुक्काम बॉस्टनला मुलाकडे हलविला होता. आणि एक दिवस अण्णांनी अनपेक्षित वाईट बातमी दिली... *"Jayant, Pramod is no more with us..."* माझं मन सुन्न झालं. होणाऱ्या भयंकर त्रासातून ते मुक्त झाले अशी मनाची समजूत घातली. आत्मचरित्रासाठी त्यांनी लिहिलेल्या आठवणी आठवणीतच गेल्या. याचंही मनस्वी दुःख झालं. या विचारात असतांना मृणालताईंनीही अचानक जगाचा निरोप घेतला होता ही धक्कादायक बातमी आमच्या उशिराने कानावर आली...



*१) विश्वविख्यात वास्तुरचनाकार सुधीर जांभेकर यांच्या घरी बातचीत करतांना प्रमोद चेम्बुरकर... २) जांभेकरांच्या घरी. वीणा, ज्योत्स्ना जांभेकर, मृणालताई व मी. मागे: सुधीर जांभेकर व प्रमोद चेंबूरकर... ३) सुधीर जांभेकरांचा सल्ला घेतांना प्रमोद चेम्बुरकर...*

नंतर वर्ष निघून गेलं परंतु, माझं मन चेंबूरकरांसह त्यांचा आठवणीत गुंतलं होतं. मुलांचा शोध घेऊन त्यांचं ते हस्तलिखित मिळविण्यासाठी मी खूप प्रयत्न

केलेत. पण ते सर्व व्यर्थ ठरले.
पुढे मी नाईलाजाने त्याचा नाद सोडून दिला. वाईट याचं वाटलं की, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात जागतिक कीर्ती मिळविलेले, सामाजिक कार्यकर्ते, नि:स्वार्थी व दानशूर असे ‘चेंबूरचे हे चेंबूरकर’ ही अबोल व्यक्ती किती ‘महान' होती ते या जगाला कळले नाही. नव्हे, त्यांचं आत्मचरित्र जर प्रकाशित झालं असतं तर, साऱ्या मराठी समाजाला त्यांचा अधिक परिचय झाला असता.
तो झाला नाही याचं मनस्वी दु:ख मला होतंय. म्हणून हा लिहिण्याचा खटाटोप मी केला. आज आपल्या मराठी समाजात अनके सामान्य, असामान्य, कर्तबगार, प्रसिद्ध-अप्रसिद्ध व व्यावसायिक-अव्यावसायिक ओळखीची-अनोळखी व्यक्ती-मित्र मंडळी, शेजारी-पाजारी आहेत. आपली संस्कृती व संस्कार आपल्याबरोबर जाण्यापूर्वी त्याचं नव्या-जुन्या पिढीसाठी डॉक्युमेंटेशन व्हावं.
अर्थात, वेळ निघून जाण्याआधी. ही माझी मनोभावे सदिच्छा... असो.

मंडळी, चेंबूरकरांची थोडक्यात माहिती येथे देतो: मुंबईतील प्रामुख्याने संपूर्ण चेंबूर हे शहर वडलोपार्जीत चेंबूरकरांचे होते. त्यामुळे त्यांचे आडनांव संस्थानाप्रमाणे 'चेंबूरकर' पडले होते. चेंबूरच्या स्पोर्ट्स विभागाचे प्रमोद हे संस्थापक व अध्यक्ष होते. क्रिकेट या खेळात त्यांना अधिक रस होता. चेंबूर क्रिकेट क्लबचे ते कप्तान होते. आणि ते नामवंत ऑफ ब्रेक बोलर व फलंदाज होते. वडिलांच्या सांगण्यावरून Pharmaceutical क्षेत्रात ते अपघाताने गेले होते. आणि अहमदाबाद येथील सुप्रसिद्ध Pharmaceutical College मधून त्यांनी Doctorate मधून प्रथम श्रेणीत पदवी मिळविली होती. तिथे त्यांनी कांही वर्ष प्राध्यापक म्हणून नोकरी केली व उच्च शिक्षणासाठी त्यांनी अमेरिका गांठली होती. फ्लोरिडा येथील विद्यालयात असतांना त्यांनी आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसह अमेरिकेत प्रथम क्रिकेट सुरु केले. आणि गीतेवर प्रभुत्व असल्याने समाजात गीतेवरील अभ्यास देण्याचे सामाजिक कार्य ते आवडीने करीत होते. त्याचबरोबर धार्मिक कार्यही त्यांनी केले. अनुषंगाने पूजा-अर्चा-पौराहित्य कार्यही ते करीत होते. नंतर पूर्ण व्यवसायामुळे ते पूर्वेला आले आणि स्थायिक झाले. सामाजिक कार्याबरोबर मुळात मराठी समाजासाठी असलेली तळमळ

सुटली नव्हती. त्यामुळे प्रथम स्थापन झालेल्या फिलाडेल्फिया मराठी मंडळाचे ते अध्यक्ष झाले. नंतर न्यू जर्सीत येऊन मराठी विश्व या संस्थेत पूर्णवेळ कार्यान्वित होऊन त्यात स्वतःला झोकून दिले होते. इतरांबरोबर मराठी विश्व कम्युनिटी सेंटरची कल्पना त्यांनी मनावर घेतली. त्यात तन-मन-धन घालून मराठी विश्व कम्युनिटी सेंटरचे सर्वदृष्ट्या ते भक्कम पाया बनले. मराठी विश्व कम्युनिटी सेंटरच्या मागे चेंबूरकरांची प्रेरणा, शारिरीक व आर्थिक श्रम किती होते त्याची कल्पना सर्वांनाच आहे, नव्हे, ते विसरणे शक्यच नाही... असो.

व्यावसायिक क्षेत्रात जागतिक स्थरावर अनेक नामवंत औषधी कंपन्यांचे प्रमोद हे सल्लागार म्हणून काम करीत होते. त्यामुळे ते सदैव फिरतीवर असत. युरोप येथे त्यांनी कांही प्रसिद्ध औषधी कंपन्या प्राथमिक स्वरूपातून अखेरपर्यंत फलद्रुप होईपर्यंत यशस्वीपणे प्रस्थापित केल्या आहेत. हे निश्चितच भूषणावह व अभिनंदनीय होते. आणि अशाच इतरही अनके उल्लेखनीय कार्याची माहित जेव्हा प्रमोद यांनी मला सांगायला सुरुवात केली होती, त्याचवेळी मी त्यांना हे सर्व लिहून काढून पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याचा सल्ला दिला होता. आज चेंबूरकर आपल्यात नाहीत. पण निदान मला माहित असलेल्या त्यांच्या ‘अनमोल’ आठवणी तुम्हाला सांगता आल्या याचा आनंद होत आहे. 'एक हाती टाळी वाजत नाही' हे आपण जाणतां. मृणालताईंचाही प्रमोद यांना सर्व बाबतीत असलेला आधार व सहकार्य फार मोलाचं होतं. तसेच, त्यांची कर्तबगार व दोन गुणी मुलं, योगेन व दीपेन त्यांची त्यांना साथ होती. आज जर प्रमोद यांचं ते 'हस्तलिखित' या मुलांनी मनावर घेऊन प्रकाशित केलं तर, त्यांच्याबरोबर मलाही पुण्य लाभेल यात शंका नाही. प्रमोद व मृणालताईंना मिळेलेली आदरांजली व हेच पुण्यस्मरण असेल... असो. प्रमोद व मृणालताई यांच्या आत्म्यास मनःशांती लाभो ही देवाजवळ प्रार्थना..!

त्यांची अधिक माहिती येथ वाचावी:
https://www.google.com/search?client=safari&rls=en&q=dr+pramod+chemburkar&ie=UTF-8&oe=UTF-8 आणि

https://www.google.com/search?client=safari&rls=en&q=dr+pramod+chemburkar+nj&ie=UTF-8&oe=UTF-8

जयंत विठ्ठल कुळकर्णी
jvkny1@gmail.com

---